# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७३१३


क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/ 9936

दिनांक :- 9६/५/२०१५

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व खाजगी विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र.

पदवीका/पदवी संस्था तसेच एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी संस्था.

**विषय:- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थेमध्ये व्यावसायीक अभ्यासक्रम प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्केप्रतिपुर्तीबाबत.**

**(मराठा/मुस्लिम प्रवर्गातील आरक्षणातुन प्रवेशित तसेच यापुर्वी अर्ज न भरु शकलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाबाबत)**

**संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे.**

संदर्भ :- मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १५/तंशिस/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४-१५/२३ दिनांक १४ मे २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मराठा व मुस्लिम हया समाजातील विद्यार्थ्यांचा समावेश सामाजिक न्याय व आदिवासी विकास हया विभागातर्फे २०१४-१५ हया शैक्षणिक वर्षाच्या फी प्रतिपुर्ती योजनेंतर्गत निर्गमित झालेल्या शासन धोरणात समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांची उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिनांक २० मार्च २०१५ च्या शासन निर्णयाव्दारे मान्य केलेल्या धोरणाअंतर्गत फी प्रतिपुर्ती योजने अंतर्गत समावेश करणे आवश्यक होते.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थामधील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मराठा/मुस्लिम समाजातील विद्यार्थी तसेच यापुर्वी अर्ज भरु न शकलेल्या विद्यार्थ्यांनी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेतलेला आहे अश्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपुर्ती योजनेची अमलबावणी करण्याकरीता (ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर दिनांक १५ मे २०१५ ते २५ मे २०१५ पर्यंत अर्ज भरण्यासाठी लिंक देण्यात येत आहे. तेव्हा आपल्या संस्थामधील वरील विद्यार्थ्यांनी दिनांक २५ मे २०१५ पर्यंत संगणकीय प्रणालीवर अर्ज भरावा व भरलेल्या अर्जाची प्रत प्रमाणित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह (विद्यार्थ्यांनी यापुर्वी कोणत्याही योजनेतुन शैक्षणिक शुल्काचा लाभ घेतलेला नाही असे स्वयं घोषणापत्र सादर करणे अनिवार्य राहील तसेच इतर योजनेतुन लाभ मंजुर झाल्यास या योजनेव्दारे प्राप्त झालेली रक्कम शासन जमा करण्यासबंधी सुध्दा घोषणापत्रामध्ये नमुद करावे ). सबंधित संस्थेने विद्यार्थ्यांचे ऑन लाईन अर्जाची छानणी करुन अर्ज दिनांक २६ मे २०१५ पर्यंत या कार्यालयास सादर करावे..

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रतिलीपी :-** प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.